
॥ श्री राष्ट्रदेवता प्रसन्न ॥

# भारत—मावळे मराठा—मेळा

# पदें



प्रकाशकः—लक्ष्मण ग्यानुजी राक्षे, यांनीं पुणें, पेठ नारायण घ. नं. ३६४ येथें प्रसिद्ध केलीं.

मुद्रकः—सिताराम गणेश गोडबोले, यांनीं पुणें पेठ बुधवार घ. नं. १२६ येथील "महाराष्ट्र" प्रिंटिंग प्रेसमध्यें छापिलीं.

मालकांनीं सर्वस्वी हक्क आपले ताब्यांत ठेविले आहेत.

आवृत्ती १ ली.

सन १९२२

# भारत-मराठा मावळे-मेळा
# पदें.

—०:०:०—

## पद १ लें. चाल--दिंडी

ज्याचे वंशीं स्वराज्य धर्मसेवा। त्याचे वंशीं मज जन्म देगा देवा ॥ १ ॥ वारंवार विनंती आयकावी। दयासिंधू हीं सर्व सिद्धी न्यावी ॥ २ ॥ ज्याची वाणी रंगली स्व-राज्य कामीं। तीचे मज धडा मिळो रामनामीं ॥३॥ म्हणे टिळकदयाघन महाराजा। रामदासाचा संग घडो माझा॥४॥

## पद ॥ २ ॥ रें. गुरुजी तुमच्या प्रीतिस पार नसे।

गिरिधरा वंदितो तव चरणीं। मोहक रूप तुझें मज मनाला। भुरळितसे पाहुनी ॥ १ ॥ आम्हा बालका तव पदाहूनी। देउ नको वा लोटुनी ॥ २ ॥ तुम्हाविणें आ-म्हा कोण जगिं। काढाल दुःखातुनी ॥ ३ ॥ सद्बुद्धि दे हेचि आतां। घेतो मीं हें मागुनी ॥ ४ ॥

## पद ॥ ३ ॥ चाल ॥ अनवाणी चालायाची ॥

गणराया तुम्ही या या। संकटीं आम्हा ताराया। या जगीं ॥ १ ॥ तुजविणें आम्हावर माया कोण करील सांगरे सदया ॥ या. २ ॥ ॥ चाल ॥ सद्बुद्धी आम्हाला द्याया। तुम्हाविण राया कोणरे भक्ता ॥ सांभाळी वत्सला आतां ॥ या. ॥ २ ॥ दीनाची करुणा कोणा। येईल तुम्हावीण जाणा ॥ या. ॥ आम्हा तारा अथवा मारा। हा देह अर्पीला सारा ॥ तयापदी ॥ चाल ॥ हा निश्चय

मनी ठेवोनी । तुमच्याहि चरणी लावीले मना ॥ त्या सांभाळुनी दीना । तुम्ही तरी ॥ १ ॥

॥ पद ४ थें ॥ कोरस ॥

श्री मंगल गणराया, सुचिकाया, हतमाया, गिरीजा तनया ॥१॥ मो वक्रतुंड, जगदंड, मंड मद, मलीन गंड, श्रीखंड पुंड, श्रुति श्रवणा ॥२॥ हा दास तनय हेरंब, सु-भक्तालंब, कमल कादंब, कुसूम कनांग, भुषिता सदया ॥

पद ५ वें ॥ चाल ॥ मूर्तीमंत ॥

धाव पाव माझा भाव । तयापदीहो शंकरा ॥ चाल ॥ दया धरा उमावरा। दिनावरी कृपा करा । हीच आस पूर्वो-यास । यावें मावें गौरिहरा ॥ १ ॥ नरदेहातुनी आज । सोडवा देवा मज । गांजलो मी राखा लाज तुम्ही माझी गिरीजावरा ॥ १ ॥

॥ पद ६ वे ॥ चाल ॥ गोविंदा सोड असलारे. ॥

मानवा जगीं तारीरे हरी तूज नाम । हरि तूज नाम सदा मेघशाम । आठवावा मनी ॥ नित्यरे करी पूर्णकाम ॥ १ ॥ जरी असे अंगी पाप हरे आपोआप । नित्य करा जपरे मनी राम नाम ॥ येणे होय सुटका नका दवडूं वटका । जलदीने तुम्ही घ्यारे हरि राम नाम ॥ २ ॥

पद ७ वें. ॥ चाल ॥ जग सारे हें ॥

वा वा रें । हें असे कसे । सरकार कारे ॥ १ ॥ तुळशी पेटा हे बुडवीते । त्यांत यांचे कांहीं न डुबते । मग कां करी उलथे पालथे ॥ २ ॥ कमाई कुठून केली यांनीं । आयत्या पिठावर बैसुनी । सगळे भोंदू हें होत

धनी ॥ ३ ॥ अनाथांचे म्हणे उदार । मोठे दयाळु सरकार । पहावयास करणीचा चोर ॥ ४ ॥ चौपन गांवें आम्हा द्यावें । मुंबापुरी गिरणींत जावें । म्हणे भीक मागून खावें ॥ ५ ॥ हें न्याय नितीचे आगर । यांचा डंका हो गांव भर । आज मेले कां न्याय देणार ॥ ६ ॥ अशी यांनीं हो दंडेली । मुळशी पेट्यांत चालविली पुसता कोणी नच या कालीं ॥ ७ ॥ जमीन यांच्या कां अजोबाची । आम्हा मिळाली शिवबाची । मधें लुडबूड कां थांडगूळाचीं ॥ ८ ॥ आमचे आम्ही मालक असतां । मैंदाने तुमची कां सत्ता । उचले कंबरा बांधिती आतां । ९ । टाटा मोठा बेटा शहाणा । कॅमेरान शेंदाड दाणा । हा टुकड बाबूंचा धींगाणा ॥ १० ॥ खूप सराफीचा धंदा । दुसऱ्याची घरें जळुन धंदा । काढीला पोटास मिळण्याचा चंदा ॥ ११ ॥ हूल दावून पैशाची । यांत, कमाल सत्य शोधकांची । त्यांत फितुरी यां लुच्यांची ॥ १२ ॥ तनाशाची काढून टून । लावणशा म्हणून करी दोम दोम । फूट पाडण्याची धामधूम ॥ १३ ॥ नका ऐकूं यांच्या थापा । हव्या तेशा झोकतील गफा । अन्नावीण मराल फुका ॥ १४ ॥ टाटा मोठा दावून खोटा पैसा घेऊन करतील तोटा । शेवटीं बसेल पोटा चिमटा ॥ १५ ॥ पूर्वज माय भूमिस्तव मेले । त्यांत धरण यांनीं चालिवले । या भुट्टे चोरांना बरें फावले ॥ १६ ॥ दास लवाट्यांचा बोले । प्राण जरी आपुले गेले । नच हरकत त्याला ॥ १७ ॥

पद ८ वे ॥ चाल ॥ आमचे काळे इंग्रजी चाळे ॥

दगड्या बोले बगड्या न्हाव्याला । बंगाळ आल दिवस सकाळ धरन डोई मिळना पोट जाळव कस ॥१॥ इंग्रजी येते यासपयास करते म्हणून आली नवीन तऱ्हा बरी ॥ बोकडावानी केस डोईला दिसतो नाच्या खरोखरी ॥ २ ॥ उंटावानी बटा राखीतो डोइवरती जस तुर। जो तो म्हणतो दाढीच करे वरती नग पुर पुर ॥ ३ ॥ गुलजार चेहरा नित्य दिसावा एक दिवसा आड दाढी करी । स्वहस्ताने आपण खर्डीतो न्हाव्या सारखी धोकटी घरीं ॥ ४ ॥ कावळ्यावानी जकड तकड टोप लागले राखाया । किरिस्ताव कां बामन ह्यो कीं गवळाना बघ वळखाया ॥ ५ ॥ सुभारणेनी ताळ सोडीला उलटा आला काळ किती । धोकटी घालून खुशाल करती आपल्या आपण हजामती ॥ ६ ॥ बूट पाटलुन शर्ट आंगीं पुढें आरसा दिसावासा । फेस साबूचा लावून वस्तारा घेऊन काढी केस खसा खसा ॥७॥ बरा घेतला हातीं धंदा इंग्रजी शिक्षणांत नाहीं मजा। वेळ प्रसंगी हशी भादरून गुजरान पोटाची करूं सदा ॥ ८ ॥ इंग्रजी शिकलेले मवाळ लोक टवाळ या धंद्यात असे तोटा न्हाव्याचा करूनी हलकटांनीं पोटावर दिले पाय कसे ॥ ९ ॥ हशी भादरून पूर्वी होतसे आमची गुजरान कशी बशी । विळायतच्या माकडांनीं कातर आणुन पाडीले तोंडघशी ॥ १० ॥ बडे लोक आणि पोर सारे फ्रेंचकट करती मिशीवरी । आईबाप जणु याचे मेले काय असे वाटते खरोखरी ॥ ११ ॥ तैशाच स्त्रीया आता वागती विधवा पणाला सोडून तरी । शिक्षणामुळे कोळशे माकलेचे

सकेशा आतां घरोघरीं ॥ १२ ॥ अशा स्थितीमुळें कांहीं उमगेना विधवा कां ह्या सुवासनी । आठवण बयाला नसल कुंकूवाची देहितून घ्या एक समजुनी ॥ १३ ॥ बालपणाला हें ही चालेल ऐशा गोष्टी मजला जरी । तरुण वृद्धपणी कसे शोभावे जन सारे पहा थू: थू: करी ॥१४॥ सवळ ववळ स्वांग द वितो ढ्ढांग करुनि खर बर । कस यांच्या जातींला म नव यांच्याहुनी आम्ही बर ॥१५॥

पद ९ वे

सुधारणेची कमाल झाली जगांमध्यें आज । कोणी कुणाची कलीयूगामध्यें राखीना लाज ॥१॥ जो तो म्हणता मीच शहाणा कुणी द्यावें ज्ञान । नवीन फयाशनच्या चैनि मुळें झाली चोहोंकडे घाण ॥ २ ॥ आज्यास नातूं शिकवूं लागला इंग्रजिचे ज्ञान । म्हणून सुटली गीत जुने मग एस फयास करून ॥३॥ स्वतंत्र व्हावें निरय सांगाया नको आज्ञेत रहाण । मनि येईल तैसे भटकावे उडाणटप्पू प्रमाण ॥४॥ थ्यॉक्स गूड येतांच मग त जातिचे जातां साहेब बनून । कुठें ही खावें कुठें ही रहावे हॉटेलांत बसून ॥५॥ मग चैनी खशालीचे आंगीं जडे ढंग कुठून येईल ज्ञान । झुर्टींग शोकीं फटींग कुत्ते जसे फिरते गल्लीगल्लीन ॥ ६ ॥ असे जिकडे तिकडे छाकटे शोकीं तरुण बाड लोक । शून्य पगार मिळे मग दाखवी शंभराचा झोक ॥७॥ रहाणी नकलेची छान शोकीची जशा वेशेचा झोक । ( तसा ) चटई आरसा खूर्ची टेबल ( याचे ) तीन पायाचे एक ॥८॥ फुटकीं केटलीं नकटी कपबशी तुटका चहाचा बेत । आंबट शोकीं गफा झोकी रावसाहेबी बेत ॥९॥ जूना पुराणा थी-

गळाचा एक कमानगोसवा बूट । तुटका फाटका विजारी आंगीं गुजरीतिल सूट ॥१०॥ सांज प्रकाळ जसे निघती फिराया गव्हर्नरचे लेक । पेपावरां वरून किंमत करुनी थुंकत जन लोक ॥११॥ अशाच प्रकारें गव्हांपोंवरी सफलर्चा झोक । रेलफाटवर जशी अृत नंदोस तपा दिसतो लेक॥१२॥ पहा मिजासीने पानपट्टी खाउन चाले थुंकत । चांभाराची जणूं सागळ रंगते अशा दिसे मुखांत ॥१३॥ रंगी बेरंगी छडी हातीं चाले बुटावर ठोकीत । याचे नांवानें घरीं दारीं पहा लक्ष्मी रडत ॥ १४ ॥ रावबहादूर आले अंग टाकाया धुपधुप करीत फिरून ॥ तीन पायाचे कोच करावे काय पडले उलपून ॥ १५ ॥ सुधारणेने चैनी शोकाची चढतीच हो कमान । अजूर बाबानो सावध व्हा व्हा सोडा फयाशन ॥ १६ ॥ दास लखाटयाचा अनुभविला सर्व जगीं पाहुन । खऱ्या खोट्याचा दाखला द्यावया पडतें न्याहाळून ॥ १७ ॥

॥ पद १० वे ॥ चाल ॥ कशी करणी कळा इश्वरी ॥

गेला मेला ठार जगीं झाला । मुळशी पेटा बुडला अन्नाची मोताज मावळच्याला ॥ नाहीं करुणा भगवंता तुला । करावे काय याला उपाय सांगा मजला ॥ जी ॥ कसे नेत्र झाकिले त्वा देवारे अहा अहा । अघटीत करणी कळा तुझी बा । आलेरया संकटाच्या वेळा । हरी तुम्ही टाळा । अंत किती पाहतां आतां जगपाळा ॥ २ ॥

॥ चाल ॥

नानापरि विनविले धरणासाठीं टाटाला ॥ जी ॥
नको लँड अक्वीझेशन लावूं आमच्या नशीबाला ॥ जी ॥

पूर्वार्जित आम्ही या आठशे वर्षं जागेला ॥ जी ॥ दे-
णारा आमुचा शिवबाराजा गेला जी । म्हणून परक्यानी हा
धींगाणा चालविला जी ॥ जी ॥ ३ ॥

पूर्व

विनंतीचा उपाय आमचा हरला । म्हणून सरकारला ।
कांहीं अर्ज केले पार्लमेंटला ॥ तेथून त्यांनीं धुडकावून दी-
ला । उपाय नाहीं त्याला ॥ पुढें पहा सत्यागृह ठरवि-
ला ॥ जी ॥ ॥४॥

मावळे मराठ जातींचें । अज्ञानी मतांचे । बापुडे
काय करतील जबरीला । म्हणून पांढरपेशा मदतीला ।
घेउन बचाव केला ।पुढें पहा हाल कसे नशीबाला॥ जी॥५॥

॥ चाल ॥

गेले सत्यागृही लोक तुरुंगवासाला । जी । नच अ-
न्याय कांहीं पुण्य करीत कर्माला । जी । मुरकुटे परांजपे
देव करंदीकराला । जी । रानडे दास्ताने सुमंत गोखले
याना । जी । साठे देशपांडे अंकलीकर भवानी म्हाराला ।
जी । पळसुळे बापट आणिक कांहीं फिरकोळ लोकाला
। जी । जबरीनें धरून करी दंड शिक्षा सर्वाला ।जी । ६।

पूर्व

यांचा छळ कसा कसा झाला । वर्णीन पुढें त्याला ।
रखमाई दमालीचे मोल कोणाला । देववेना माझ्या जिव्हे-
ला । मुळशी पेट्याला जया भोइनीनी झेंडा फडकविला॥जी॥
॥७॥ कष्ट करून मजूर काम करीं । दुष्ट अधिकारी । प
हारा त्यावरी । सत्य करीती । पहावयास मिथ्य त्या अंती
नीच त्यांच्या कृती । पुढें कशा घडती ॥ जी ॥८॥

॥ चाल ॥

ठेवीले भुट्टे बंगाल आणिक बंगाल ॥ जी ॥ सत्यागृही लोकांना मारघ्याया चांगल ॥ जी ॥ कोल्हापुरी म्हार मांगडे पठाण बंगाळ ॥ जी ॥ ॥ ९ ॥

॥ पुर्व ॥

अशा दुष्टांच्या कृतीस । ह्या माउल्या । हालास नाहीं भ्याल्या । कॅमेरानचे यूव्हचक्र यांनीं फोडले । हे परक्यास न साहीले । राड्रिग्ज गवहू आले । अब्रू घेतीं तरी बाया नच बोले ॥ जी ॥१०॥

॥ चाल ॥

कॅमेरान मारीतो लाथ णाचा शिरीस हात ॥ जी ॥ हाय हाय दैवा काय नशीबीं हा बेत ॥ जी ॥ जयाबाई भोईनिचे दुसरा लुगडे फेडींत ॥ जी ॥ पहावेना डोळ्यांनीं स्थिती हृदय फाटत । तीसरा धरून कुचडा केस तानून ओढींत ॥ जी ॥ असे निच लोक प्रभू कसे ठेवले जगतात ॥ जी ॥ चवथा करी स्पर्श उरास दोन्ही बाजूस ॥ जी ॥ पाहून आग भडके तळपायाची मस्तकांत ॥ जी ॥ सहावा बायां पुढें, उभा नग्न आस ॥ जी ॥ होय लाही अंगाची उपाय नाहीं तिथ ॥ जी ॥ ॥११॥

॥ पुर्व ॥

खऱ्या पतिव्रता धीराच्या । खंबीर मनाच्या । फरक नाहीं शांतित तीळ मात्र । द्रौपदीची वस्त्र हरण्यांत । फजिती जशी होत । तसा बायांचा छळ कुळशींत ॥ जी ॥ ॥१२॥ पोलीसांचा मोठा अधीकारी । असे एक तरी । डोळ्यांनीं पहातो अत्याचार । नाहीं ओळख आईबही-।

णींची । आपुल्या जातींची अशा उत्कर ॥ जी ॥१३॥

॥ चाल ॥

रखमाई शिंदा बोडक्या बेदम मारांत ॥ जा । जगूरास मुडद्याची पडली असे दिसत ॥ जी ॥ गोपाळ बाळजी गुजर दोन दिवस बेशुद्धींत ॥ जी ॥ शिवरामपंत परांजपे यांना मातीत कोंबीत । जी ॥ झाली लांडगे तोंड मेंढरावर अशा थटांत ॥जी॥ काका कानीटकर यांना ओढून ओढून झोडींत॥जी॥ भाऊसाहेब गोखले जबर ठोसे सोशेत ॥जी॥ जसे घाव घणाचे लोखंडावर पडत ॥ जी ॥ दांतऱ्यांचा पुढें मग कडेलोट ते करीत ॥ जी ॥ जसा रबरी चेंडू चाळे वरच्यावर उडत ॥ जी ॥ फाटकांचा पाय पडे रक्तबंबाळ होत ॥ जी ॥ जगू पंत पाण्याचा फुटला रक्त असे वाहात ॥ जी ॥ डॉ० फाटक मडक्यावानी पडले चित ॥ जी ॥ बावर्सचा एका दनक्यांत मोडला हात ॥ जी ॥ काका जोशी म्हाताऱ्याची फजिती उडे त्यांत ॥ जी ॥ ॥१४॥

॥ पुर्व ॥

गोरे याची पहावेना स्थिती बिकट झाली अती । घावी मूठ माती अशी त्याची गत ॥ ताटीचा करून रहित बेत । पुढें मंडपांत नेऊन ढोलीत ॥ जी ॥ ॥१५॥

॥ चाल ॥

सत्याग्रही विनंती करती मजूरा फार ॥ जी ॥ पोलीसांचा त्यांत मवाल्यांना असे आधार ॥ जी ॥ येई जोरांत ठोसा मारीती नाकावर ॥ जी ॥ महमद कद्दर याचा डोळा फुटून गेला पार ॥ जी ॥ तीसरा लाथ मारितो जबर वृषणावर ॥ जी ॥ होई जीव घाबरा ऊन कडक त्यांत फार

॥ जी ॥ पडे मार खाऊनी निश्चीत भूमीवर ॥ जी ॥ ज-
या भोईन मांडीवर घेऊन वारा घाली फार ॥ जी ॥ जणू
तिच्या पोटचे मूल तसे प्रेम त्यावर ॥ जी ॥ पाणी पाणी
म्हणून नाहीं जवळ झाले बेजार ॥ जी ॥ जसा मुडदा उ-
चलती तसेच दावीं नदी तीर ॥ जी ॥ ॥१६॥

॥ पुर्व ॥

अशी स्थिती बिकट जरी केली । प्रभु त्यांचा वाली ।
सत्यागृहानीं हात नाहीं लावला । किती थोरपण द्यावे त्या-
ला । गणीत नाहीं याला । याचा जाणता जगीं नाहीं उर-
ला ॥ जी ॥ ॥१७॥

॥ चाल ॥

वाईट कृत्य करण्यास कोण उत्तेजन देत ॥ जी ॥ त्या-
वरचे अधिकारी गुंडास सांगत ॥ जी ॥ ही आपली जातें
ओळखुनी जातींवर जात ॥ जी ॥ ज्याचें खावें मीठ त्यास
शिवीं देऊन बोले नीट ॥ जी ॥ ॥१८॥

॥ पुर्व ॥

पहा अधिकाऱ्याची चतुराई । बोले तरी कांहीं । गोरे
यानें केले म्हणे ढोंग । जसा मूर्ख बोलतो मांग । सडका
से अंग । पाहु मग त्याचे तुझे कां सोंग ॥ जी॥ ॥१९॥
डोळ्यानी गुन्हा जरी पाही । सत्या गृहचा नाहीं । कंपनी-
चा होतो तरी गप्प । हा नोकरीच्या धुंदीत गर्क । विषारी
सर्प । म्हणनी हा बोलण्यामध्यें करी फरक ॥ जी ॥२०॥
कांहीं मुलें लहान लहान पाहून । टंगडीला धरून । दुष्ट
ते धूंड देती फेकून । कांहीं मुलांच्या नरड्यावर । पाय
देऊन । गळा दाबून घेती जसा प्राण॥ जी ॥ ॥२१॥

॥ चाल ॥

ब्रिस्टो कलेक्टर हें पहात डोळयान ॥ जी ॥ मावळी बायाचा सत्यागृह पाहून। यामुळें रस्त्याची कामास झाली अडचण। मजूरांनीं त्यांच्या डोईचा रस्ता बनवून। पाट्याची हालचाल चालवली त्यावरून। पडे माती आंगावर गेल्या त्यांत जशा गढून। गाडगीळ वैद्य बर्वे आणिक डाबऱ्यान। जोगळेकर धर्माधिकारी कुळकर्णीन। बाबु भोई वीरकर पारेगांवकरान ॥२२॥

॥ पुर्व ॥

यांनींही त्रास सोसून। आणिक कांहीं जण। मोठ्या शौर्यानें तोंड देऊन। लढले सत्यागृही वीर। कसून बाप्यान। करंदीकर बापट यांच्या साह्यान ॥ जी ॥ ॥२३॥ मग पुढें लहान बालकांच्या। सुरंगास जसा खाच्या। पहारीनें खोदी तसा पायास यांच्या। ठोकून इच्या दाबान टाकी चिरडून। पाडीलीं मुलें घायाळ करून ॥जी॥॥२४॥

॥ चाल ॥

कर्कप्याट्रिक पोलीस सुपरींटेंडेंड यान ॥जी॥ सत्यागृही देती तक्रार घेइना ऐकून। दिले उलट उत्तर सांगे शास्त्र ज्ञान। तक्रार तुह्मा शोभत नाहीं देण ॥२४॥

॥ पुर्व ॥

कुसाबाई सुतारिन बोले। पोटची तान्ही मुलें। सत्यागृहाकरितां देऊं फेकून। नाहीं त्यांची आशा करणार रणीं लढणार। भूमीकारण देऊं आम्ही प्राण। जी। ॥ २९ ॥

॥ चाल ॥

पहावेना ऐकवेना छळ हा कानन। जी। चूप बसले

बसाल तर या जगांत व्यर्थ जीन । लावा सत्कार्यीं हा जन हो आपला प्राण । चला बांधा कंबरा सोडवा हे बंधन । तुम्हां गणरायाच्या चरणाशी हो आण ॥२६॥

॥ पुर्व ॥

हा कठिण प्रसंग आला । पाळपूं आतां चला । लवाल्याचा दास विनवी तुम्हांला । चला चला मुळशी पेठ्याला । सत्याग्रहाला जनहो उठा बांधा कमरेला ।२७।

---

॥ पद ॥ ११ वे

॥ चाल ॥ मजादेते हैं क्या यार.

इंग्रजी शिक्षणानें झाला । स्त्रियांचा जगीं बोलबाला ॥धृ॥ यानें मान चढला तिजला । शेवटचा कळस कसा घडला । देउनि चित्त ऐका त्याला ॥१॥ सोडुनि जुन्या वहिवाटीला । भाळे युरोपियन नकलेला । चटावल्या नवीन फॅशनला ॥२॥ टापटीपीचे शिक्षण तीजला । मिळे नित्य नवीन शाळेला त्यानें नखरा जडे आंगाला॥३॥ दिले टाकूनी तिनें चोळीला । तंग पोलके चढवी अंगाला । सुबकपणा गोंडस शरीराला॥४॥ वेणी नको अंबाडा तीजला। आवडे उलटे केस डोईला त्यानें रंग चढे ढगाला ॥ ५ ॥ शिक्षणानें चढे मानाला । मूद राखडी आवडेना तिजला । नकळी फूल खोवी बुचुड्याला ॥ ६ ॥ डोईवरचा पदर खांद्याला । एक रुमाल असे कमरेला । सफाईदार चेहरा ठेवण्याला ॥७॥ ही झाली हो ग्रॅज्यूएट। नवरा मिळाला मॅट्रिक पर्यंत। कसे पटेल दोघांचे बोला ॥८ ॥ मग समान हक्की आला ।

पुरुषानें जावें ना काला । आम्ही का न पाहावे तमाशाला ॥९॥ नको म्हणे पोथी पुराणाला । लागली आवड नटका-ची तिजला । मग भूले विषय रंगाला ॥१०॥ शिक्षणानें चढली पदाला । मग थाट मास्तरणीचा बनला । केव्हां कोणीही यावे भेटीला ॥ ११ ॥ नवऱ्याची अक्कल तीजला बायकोची बुद्धि याला । हा इंग्रजींत पालट झाला ॥१२॥ काहीं पुरुष आपल्या दुधाला । विसरूनी गेले मुद्याला । म्हणोन शिरकाव यांचा झाला ॥ १३ ॥ उलट पतीस बोले-काय तुजला । येते सवाई शिक्षण मजला । म्हणे ठेंग्या नशीबीं मिळाला ॥ १४ ॥ नवऱ्यास म्हणे शाळेला । मी जाते मुलाना शिकविण्याला । तुम्ही लागा घरीं स्वयंपाकाला ॥१५॥ नका चुकूं मधल्या टाईमाला । कप चहाचा पाव एक मजला या घेऊन मधल्या टीफीनला ॥ १६ ॥ हा शिक्षणानें गोंधळ केला । समान हक्कानें बैलची बनला॥ चूप बसे मिऊन अबूला ॥ १७॥ लवाड्याच दास म्हण ऐका । यांचीं मोठि पुढं आहे शंका । घडवीतिल विचीत्र लिलेला ॥१८॥

## ॥ पद ॥

अहिल्याबाई होळकरीण । झांशीची राणि गेली होउन काय सांगू लक्ष्मीबाईचे । शौर्याचे गूण । तशा नाहीं आतां बाया गेल्या शिक्षणात मढून ॥ जी ॥ ॥ १ ॥ आता नाहीं कुणी अशा गुणांत । म्हणल्या छान शोकीं पणांत । एम पगार नित्य करण्यात गुंतूनी जाई । अशा कपाळ करंट्या जन्मून उपयोग नाहीं ॥ जी ॥ ॥२॥ शिक्षणाने केला जगीं गोंधळ । नितीवर फिरला बऱ्याचोळ । ह्या लेडी सारख्या

शिकल्या कराया चाळ। त्यामुळें पातिव्रत्याचे झालें वाटूळ ॥३॥ बूट स्टॉकींग नित्य पायांत। युरोपियन लेडा सजली झोंकांत। घालुनी हातांमध्यें हात। येले नवऱ्यांत। चले मार्गे क्रमीत नेहमी सहल करण्यांत॥ जी ॥ ४ ॥ डोईवर-च्या पदराप नाहीं मान। त्यांचावरी सोडितसे हौसेन। तो नित्य उडावा वऱ्यान। म्हणून मौजेन। जाणारा येणाराच पहावे चालली ही कोण ॥ जी ॥ ॥५॥ गाद्या गिरद्या आवडेनासे झाले। इझिचियरचें प्रेम इला बहु जडले कुणी येतांच भेटाया हातांत हात देउन बोले। पुढे प्रेमाने स्व आसन बसाया दिधलें॥ जी ॥ ६ ॥ झाली ही पास परीक्षा नर्सची। हरळी इचीकाळजी हो शरीराची। जावई बोवा आं-लेरोगी करी परिक्षा त्याची। पहावया जातां लाज जडे ग मनची ॥ जी ॥ ७ ॥ नवऱ्यास म्हणे करते मी सर्व्हिस झालेलां मुलें खेळोवत आस। पूर्वीन मी सर्व व्यवहार संसा-रास। मी जाते नोकरीला तूं घर राखीत बैस ॥८॥ शिक्ष-णानें चढली इची कमान। स्वयंपाकावर कूळें इच ध्यान। मग खावयाला पाव बिस्कीटचे अन्न। पाण्या ऐवजी चहावर भागवी तान्ह ॥९॥ बाईसाहेब आल्या ऑफिसांतून। वेळे-वर नाहीं शिजलेले अन्न। पाहून लेडीला संताप गेला चढून। काय करावी शिक्षा नवरा पडली अडचण ॥१०॥ लबाडच्याचा दास म्हणे घ्या ऐकुन। यापुढे भलतेंच होई-ल ठेवा जाणून। लोकमान्य यांच्या शब्दाची किंमत मा-नून। द्यावें शिक्षण इतकेंच पुराण वाचतां यावें म्हणून ॥

———

## सबसे राम भजन

त्यागुनि कलहाच्या बीजा। व्हावें सिद्ध देशकाजा। परिस्थितीला पूर्ण जाणुनी कार्याते लागा। ध्येय एक सगळ्याचें असतां भेदा नच जागा ॥ १ ॥ मी गांधिचा भक्त म्हणुनि कां इतरां निंदावें। लोकमान्य सांगतात राष्ट्रीं ऐक्यचि साधावें ॥ २ ॥ एका वृक्षा अनेक शाखा भूरणकर होती सर्व मिळोनी वृक्ष वाढविति तशीच हीही रीती ॥ ३ ॥ एका धर्मी अनेक पंथही ईश्वर एकचि सर्वां। 'श्रेष्ठ पंथ हा' म्हणुनि न कोणी मनीं धरावें गर्वा ॥ ४ ॥ असहकारिता, खादी चरका कोण्याही मार्गा। लागुनि करणें कार्य विनाशा—अवा न द्या जागा ॥ ५ ॥ राष्ट्रकार्य चित्तांत ठेउनी उद्योगा लागा। सुचेल त्या वाटेनें जावें स्वस्थ राहवें नच गा ॥ ६ ॥ तुम्ही आम्ही आणिक तिसरे पुत्र हिंदभूचे। मातेच्या उन्नतीस लागूं छत्र आम्हा देवाचें ॥७॥ अभिनंदन वा निषेध यांचा फार बोलबाला। वाचारंभण विकार आतां पुरेपुरेसा झाला ॥८॥ भाषेपेक्षा महत्व कृतिचें तत्व मनीं ठसवा कांहींतरि करण्याला लागा टाकुनि सारा रुसवा ॥९॥ अजाण भगिनि—बंधु तयांना देशभक्ति शिकवा। जागृत करुनी राष्ट्र पुढें मग नरद हवी ती मकवा ॥१०॥ भो गजवदना राष्ट्रांतील या पळवी विघ्नांना। कार्यक्षमता आंगीं असोंदे ध्येय एक सगळ्यांना ॥ ११ ॥

---